# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**आस**

**अपर्णा महाजन**




## जगण्यातली कसोशी उलगडून दाखवणारा कथासंग्रह

''धरणाचे दरवाजे उघडावेत आणि त्यातून खळाळ पाणी वाहावं, तसा मनातल्या आठवणींना पूर आला होता. किती आठवणी आठवता हळूच हसू येत होते. किती आठवणी आठवायला नको वाटत होते. पुसाव्या वाटल्या तरी पुसता न येणाऱ्या आठवणी. जपून ठेवाव्या वाटल्या तरी समुद्रातल्या वाळूसारख्या निसटून जाणाऱ्या आठवणी.''

आठवणींचा पूर म्हणजे कथा. हातातून निसटलेल्या वाळूच्या कणाकणात विसावलेली कथा. वाऱ्यासारखी झुळूक होऊन बिलगलेली कथा तर वादळ होऊन उस्कटून टाकणारी कथा अनेक रूपांत भेटत राहते. फुलांच्या गंधाने ती कधी पुलकीत करते तर कोमेजलेल्या पाकळीतली मन गुंतून ठेवते. ती उंच झोपळ्यावर झुलवते तर कधी झोपळाच भिरकावून देते. मनाच्या सर्व भावभावनांना व्यापून टाकणारा हा साहित्यप्रकार तो कधी दीर्घ स्वरूपात समोर येतो तर कधी लघु. तरी त्याची व्यापकता, परिणामकारकता तितकीच भिडणारी, आपलीशी करणारी असते. अशा भिडणाऱ्या, आपलीशी करणाऱ्या कथांचा संग्रह म्हणजे 'आस'!

'आस' या कथासंग्रहात अठरा कथांचा समावेश आहे. या लघुकथा आहेत. यातील प्रत्येक कथा ही स्वत:चा स्वतंत्र बाज असलेली कथा आहे. 'कॉफी डेट'सारखी कथा हलकाफुलका चकवा देते तरी कॉफीसारखा तिचा स्वाद सोबत राहील इतका गोड अनुभव देते. 'निर्णय' कथेतील सोशिक कोंडमारा हा मनातील हेलकाव्यांचे वर्णन करण्याइतका मर्यादित राहत नाही, तर 'कोड' या ठिणगीपायी केवढा आगडोंब पसरू शकतो, त्यात होरपळणाऱ्या समस्त निष्पाप जिवांची मानसिक राख कशी होते, याचे वर्णन करते. 'रानवारा' या कथेचा पट खूप मोठा आहे. उगमापासून खळाळत समुद्राच्या दिशेने अवखळपणे झेपावू पाहणाऱ्या परंतु धरणाच्या भिंतीआड कोंडल्या गेलेल्या नदीसारखा.

मुलगी देखणी, चुणचुणीत आहे म्हणून ती लग्नाच्या बाजारात सहज खपून जाते. परंतु त्याच मुलीत चिमणीच्या अंड्याएवढे न्यून असेल तर तिची परवड डायनासॉरच्या अंड्यालाही मागे टाकते. पुष्पा ही त्या न्यूनाची प्रतिनिधी. तिची परवड आणि तिने जपून ठेवलेली 'गुलाबी पावडर' अशा दोन टोकांच्या दोन खांबांवर पुष्पाने बांधलेला पूल क्रूर वास्तव आणि मोरपंखी स्वप्नांचा प्रतिनिधी ठरतो.

'कोरोना'चा काळ सगळ्यांसाठीच 'ना करोना' ठरला. यात सर्वच स्तरांवरील कमावत्या हातांना जखडून टाकले गेले. त्यात विशेष दैना झाली ती परराज्यातून आलेल्या हातमजुरांची. त्यांना पुन्हा परतीची वाट धरावी लागली. ती नाइलाजाने या परतीची आणि दैना झाल्याची वर्णने सर्वत्र वाचायला, पाहायला मिळाली. परंतु त्यांच्यात स्वत:च्या चिकाटीने उभी राहणारे माणसेही निघाली. जी केवळ स्वत: उभी राहिली नाही, गावातल्या महिलांची मार्गदर्शक ठरली. त्यांचा प्रवास म्हणजे 'बेनिपट्टी' ही कथा.

स्वत:च स्वत:च्या आदराला पारखी होणे आणि ती भावना धूसर होऊन स्वत:च्या विचारांबद्दल विश्वास वाटू लागणे, अमूर्त पोकळीला अर्थगर्भ प्राप्त होणे, यांच्या शोधांचा माग काढणारी कथाा म्हणजे 'आस'.

या सगळ्या कथा वास्तवाच्या निखाऱ्यात हात घालतात. भावभावनांच्या हिंदोळ्याचा ताल अलगद पकडतात, त्यांच्यातला प्रत्येक स्वर सतारीच्या सुरासारखा हळुवारपणे उलगडून दाखवतात. माणसा-माणसांमधील नाती, व्यवहारीपण यांची गुंफण घट्ट तरी तुटणार नाही, इतकी अलवारपणे गुंफतात. या कथा वाचकाला सोबत घेत आपलेपणाचा अनुभव देतात. त्यांचा प्रवाह गतिमान असून खूप मोठा पल्ला त्यांच्या आवाक्यात साठवलेला आहे. मनोव्यापाराला मानसशास्त्रीय वर्खाची किनार आहे. निवेदनपद्धती प्रसन्न, सहज असून कधी प्रथमपुरुषी तर कधी तृतीयपुरुषी आहे. 'मनातल्या अर्ध्या कप्प्यात प्रेम आणि अर्ध्या कप्प्यात भीती' यासारखी सुंदर वाक्ये कथांमधून वाचायला मिळतात. ही समृद्धता निरीक्षण, अभ्यास, चिंतन आणि जीवनानुभवातून येते. ती लेखिकेकडे आहे. त्यामुळेच पहिलाच कथासंग्रह असूनही नवोदितपणाच्या खुणा पुसलेला संग्रह आहे. यात तीन अनुवादित कथांचा समावेश आहे. विशेष म्हणजे या सर्व कथा नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत.

प्रा. डॉ. अपर्णा महाजन या इंग्रजी साहित्याच्या प्राध्यापक असून, त्यांचा मराठी व संस्कृतचा व्यासंगही दांडगा आहे. अनेक नियतकालिकांतून त्यांचे लेखन प्रकाशित झालेले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये त्यांच्या शोधनिबंधाचा समावेश आहे. अशा व्यासंगी लेखिकेचा 'आस' हा कथासंग्रह म्हणजे जगण्यातली असोशी उलगडून दाखवणारा संग्रह आहे असे ठामपणे म्हणता येते.

सदानंद मोरे यांची सुंदर प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली असून आशयगर्भ मुखपृष्ठ अन्वर हुसेन यांचे आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**




# ग्रंथपान

**टपालकी**
**सॅबी परेरा**




**नितळ आणि निखळ भाषेतील टपाल**

''मी तसा कायमस्वरूपी विरोधी पक्षाचा माणूस आहे. सतत कुणाचेही सरकार असो मला माझ्या लिखाणातून त्यांच्या कारभारातील वैगुण्यावर बोट ठेवायला आवडतं. आज भारतीय समाजमनाची स्थिती अत्यंत नाजूक झाली आहे. भावनेला गळू झालेलं असल्यामुळे भावना दुखावते, अस्मिता दूरवर पाहत ताठ मानेनं चालत असल्यानं अस्मितेला ठेच लागते आणि संस्कृतीला पोहता येत नसल्यानं ती वीतभर पाण्यातही बुडण्याचा धोका संपवतो...''

प्रकाशन समारंभाच्या वेळी सॅबी परेरा बोलत होते आणि सभागृहातील श्रोते त्यांना मनापासून टाळ्या वाजवून दाद देत होते. तेव्हाच लक्षात आले, हे पाणी वेगळे आहे. पुस्तक वाचण्याची उत्सुकता वाढीला लागली. त्यातच अभिनेता, कवी किशोर कदम (सौमित्र) यांनी त्या उत्सुकतेचा शिरपेचात कौतुकाचे मोरपीस खोचले तेव्हा खात्रीच झाली. मराठीत आजवर अनेक लेखकांनी विनोद हाताळला आहे, पण सॅबीने हाताळलेला विनोद इतरांपेक्षा वेगळा आहे.

प्रसंग होता ग्रंथालीचा वाचकदिन. यावेळी सहा पुस्तके प्रकाशित झाली त्यापैकी सॅबी परेरा यांचे एक पुस्तक होते 'टपालकी'! 'टपालकी' हे पुस्तक लेखांच्या संग्रहाचे. लोकसत्ताच्या 'लोकरंग'मध्ये प्रकाशित झालेले हे लेख आहेत. खरे तर पूर्वप्रसिद्धीनंतरचे लेखन पुनर्प्रसिद्धी म्हणजे वृत्तपत्रीय भाषेत शिळेपण, परंतु प्रस्तुतचा लेखसंग्रह याला अपवाद म्हणावा लागेल. तसे हेही लक्षात घेण्यासारखे आहे की काही लेखन हे एका वाचनात कधीच शिळे होत नाही. पुन्हा पुन्हा वाचण्यातून त्यातला आनंद अर्थासह प्रत्येक वेळी नव्याने उलगडत जातो. 'टपालकी'मधील लेखन हे या प्रकारात मोडणारे आहे.

सॅबी परेरा यांचा हा पहिलाच लेखसंग्रह आहे, परंतु त्यांच्या नियतकालिकातून प्रकाशित झालेल्या साहित्याची यादी मोठी आहे. विविध क्षेत्रांत असलेला त्यांचा वावर आणि त्यात उमटलेले त्यांच्या बहुआयामी व्यक्तित्वाचे प्रतिबिंब चतुरस्रपणाचे दर्शन घडवणारे आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनातला चौफेरपणा दाद द्यावी इतका दमदार आणि तितकाच सुंदर आहे. वृत्तपत्रातून सातत्यपूर्ण लेखन करणे, त्यासाठी वेळेची मर्यादा राखणे म्हणजे लेखकाची कसोटी पाहण्यातला प्रकार. यामुळे कदाचित लपविण्याचा, तेवढेच संदर्भ पुन्हा पुन्हा येण्याचा, प्रसन्न ??? हरवण्याचा धोका अधिक असतो. परंतु टपालकीत असे विसंवादी असे काहीच आढळत नाही. प्रत्येक लेख स्वतंत्रपणे आपला बंध जपतो. प्रत्येकाचा विषय, आशय स्वतंत्र आहे तसा त्यांच्यातला नितळ निखळपणाही स्वतंत्र आहे. त्यामुळे वाचनाचा म्हणून जो आनंद असतो, तो कुठेही विरळ होत नाही.

लेखक म्हणून अनुभवातून पाहताना जे दिसते तेच लेखनाचा विषय म्हणून निवडलेले आहेत. प्रत्येकाकडे पाहताना लेखकाची नजर ही त्या विषयाच्या आरपार जाणारी असावी लागते. तरच जिच्यातले वैगुण्य, उणीव, वर्म सापडू शकते. अशा नेमक्या जागा सॅबी यांनी टिपलेल्या आहेत, परंतु त्यांना टराटरा न फाडता अलगदपणे एकेक धागा उसवलेला आहे.

'पाऊस तसा मनानं साधाभोळा आहे. एक आपलं भारतीय हवामान खातं सोडलं तर बाकी कुणाशी त्याची खुन्नस असल्याचं माझ्या ऐकिवात नाही.'

'गटारांची, नाल्यांची स्वच्छता म्हणजे तरी काय असते? एका ठिकाणाची घाण आणि कचरा उचलून दुसरीकडे टाकणं.'

'दोन सीटच्या मध्ये उभे असताना येणाऱ्या–जाणाऱ्या प्रत्येकाच्या बॅगा रॅकवर ठेवण्याचं व काढण्याचं काम हसतमुखानं करण्याची सवय झाल्यानं सासुरवाडीच्या नातेवाईकांची मर्जी कुरकुर न करता सांभाळण्याचं कसब सहजसाध्य होतं.'

'एकदा पत गमावली की आपण वाटेल तसं वागायला मोकळे होतो.'

'झुंडीतल्या आणि नशेतल्या लोकांना बोलण्यात काही अर्थ नसतो.'

'मुंबईचा नवरात्रोत्सव खरोखर प्रेक्षणीय असतो. आता महाराष्ट्रात निवडणूक नावाचा एक मोठा गरबा होऊ घातलाय.'

अशा कितीतरी वाक्यांतून लेखकाने निरीक्षण, चौफेरपणाचा प्रत्यय दिलेला आहे. आगाऊ, वाट, गण यांसारखे अनेक अर्थांनी आलेले शब्द श्लेष साधतातच, शिवाय लेखकाच्या भाषेवरील हुकुमतीचाही परिचय देतात.

लेखासाठी पत्रलेखनाची पद्धत स्वीकारलेली आहे. पण लेखक हा मुंबईसारख्या शहरी भागातला आहे. त्यामुळे बहुतेक विषय शहरी भागातील आहेत. हा लेखक 'सदू' या नावाने वावरतो. परंतु प्रत्येक पत्राच्या शेवटी असणारा 'आपला सदू' 'तुझा स्वातंत्र्यप्रेमी मित्र, 'अप्पर सर्किट मित्र', 'चु–गली बॉय', 'सफरींग मित्र', 'लंबोदर मित्र' अशा अनेक विशेषणे असलेला, तरी आशयाशी नाते सांगणारा मित्र आहे. तर ज्याला पत्रे लिहिली तो दादू हा ग्रामीण भागातला आहे. या दोघांतला पत्रसंवाद हा शहरी–ग्रामीण असा आहे. हा संवाद सुसंवादी असून तो तिरकस, बोचरा, उपरोधी वाटत असला तरी त्याला सकारात्मकतेची किनार आहे. विनोदाची झालर आहे. त्याची भाषा प्रवाही आणि भरभरून नाते सांगणारी आहे. त्यामुळे हे लेख पुन्हा पुन्हा वाचण्याचा मोह होतो.

किशोर कदम (सौमित्र) यांची छानशी प्रस्तावना या संग्रहात लाभलेली आहे. त्यांनी केलेले कौतुक आणि टिपलेली निरीक्षणे लेखकासाठी शाबासकीची दाद म्हणता येईल.

लेखकाने मनोगतात आपल्या लेखनप्रवासाविषयी लिहिले आहे. त्यातून त्यांचा लेखनदृष्टिकोन लक्षात येतो.

नीलेश जाधव यांनी आशयाशी नाते सांगणारी चित्रे प्रत्येक लेखासाठी सुंदरपणे साकारलेली आहेत. मुखपृष्ठाची कल्पनाही उत्तमच!

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

स्वरमंजूषा
योजना शिवानंद




## संगीताचा खजिना

''१९७६ साली योजना सप्रे ही महाविद्यालयात जाणारी एक झपाटलेली नाट्यवेडी मुलगी होती. अभिनयासोबत तिला अभिजात गाणंही येत होतं. ज्येष्ठ नाट्यकर्मी अमोल पालेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'इंडिया कल्चर लीग'च्या 'द्रौपदी' या नाटकात दहावीत असतानाच तिनं काम केलं होतं. आत्मा आणि धर्म कलाकाराचा होता. तेव्हा जसा होता तसा आजही टिकून आहे.''

'स्वरमंजूषा' हे योजना शिवानंद यांचे चौथे पुस्तक 'आषाढी', 'अम्लान' आणि 'आषाढी – संतकाव्याचा अनोखा रंग' ही त्यांची तीन पुस्तके यापूर्वी प्रकाशित झालेली आहे. गायन आणि अभिनय अशा दोन्ही कलांवर प्रेम आणि आपल्या कर्तृत्वाची मोहोर उमटवलेल्या योजना शिवानंद यांनी लेखन या कलेवरही आपली नाममुद्रा ठळकपणे कोरून ठेवली आहे असे विधान त्यांच्या लेखनप्रवासाकडे पाहून निश्चितपणे करता येते.

स्वरमंजूषा या शब्दाचा अर्थ त्यांनीच त्यांच्या मनोगतात स्पष्ट केलेला आहे. मंजूषा म्हणजे पेटी, संदूक, तिजोरी किंवा खजिना. त्या अर्थाने संगीत क्षेत्रात असलेल्या दिग्गज नामवंत मान्यवरांच्या परिचय असलेला हा खजिना आहे. त्याचे शीर्षक आहे स्वरमंजूषा. सवाईगंधर्व, डॉ. गंगुबाई हानगल, भारतरत्न पं. भीमसेन जोशी, पं. शिवकुमार शर्मा, पं. काणेबुवा, पं. यशवंत देव, श्रीनिवास खळे, नटवर्य भालचंद्र पेंढारकर, उस्ताद अब्दुल हलीम जाफरखान, पं. चंद्रकांत कामत, पं. प्रभाकर जोग, कवी शंकर वैद्य, मनुकाका पंडित आणि शिवानंद पाटील या मान्यवरांचा यात समावेश आहे. या सगळ्याच दिग्गजांची संगीतकारकीर्द यशाच्या शिखरावर पोहोचलेली. त्यांची कीर्ती सर्वदूर पसरलेली. अशा मातब्बरांविषयी लिहायचे म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखे आहे, असेच म्हणावे लागेल. हे लेखन लेख स्वरूपातील असून ते यापूर्वी 'नवशक्ति' या दैनिकातून प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचे संकलन या 'स्वरमंजूषा'त आहे. परंतु या संकलनाला दोन पैलू आहेत. एक म्हणजे मूळ लेख जसेच्या तसे संग्रहित केलेले आहेत. आणि दुसरा भाग म्हणजे '...आणि आता...' या शीर्षकाखाली त्यात नव्याने सुधारित भर स्वतंत्रपणे घातलेली आहे.

मान्यवर कलावंताविषयी प्रत्येकाचा मनात आदर असतो तसे कुतूहलही असते. या क्षेत्रात त्यांचा प्रवास कसा सुरू झाला, त्याचे गुरू कोण, त्यांनी कला आत्मसात कशी केली, कलेतील बारकावे कोणते, यशापर्यंत त्यांचे हात कसे पोहोचले? या आणि अशा अनेक प्रश्नांची मालिका या कुतूहलात दडलेली असते. ती समजून घेण्याची उत्सुकताही मोठीच असते. विशेष म्हणजे व्यक्तिचित्रण केले जाते तेव्हा याच प्रश्नांची उत्तरे त्यात अपेक्षित असतात. त्या दृष्टिकोनातून या लेखसंग्रहाकडे पाहता येईल आणि अपेक्षापूर्तीचा आनंद पदरात पडेल. पं. कुमारगंधर्व यांची मुलाखत त्या दृष्टीने महत्त्वाची म्हणता येईल. कुठल्या गायकासाठी, गायनक्षेत्रात पदार्पण करण्यासाठी आणि संगीताची जाण असणाऱ्या प्रत्येकासाठी ही मुलाखत म्हणजे संगीताविषयीचा एक पाठ म्हणता येईल. ही मुलाखत म्हणजे संगीतमैफलच म्हणावी लागेल. पं. यशवंत देव संगीताविषयी कसा विचार करतात. शब्द, श्वास, बीट, हळुवारपणा आणि जागरूकता, तल्लीनता याविषयी कसे मार्गदर्शन करतात, हे वाचल्यानंतर कळते ते या पदापर्यंत पोहोचण्याचे रहस्य काय आहे.

मुखड्याचा षड्ज आणि अंतऱ्याचा षड्ज यांच्यातील गमक सांगताना त्या श्रीनिवास खळे यांचे वैशिष्ट्ये कसे इतरांपासून वेगळे आहे ते उलगडून दाखवतात. म्हणूनच त्या त्यांना 'रसऋषी' असा किताब बहाल करतात.

पं. शिवानंद यांचा परिचय, त्यांच्यासोबतचे सहजीवन हा कालखंड म्हणजे लेखिकेच्या काळजातले कस्तुरी अत्तर. शिवानंद हे पती आणि गुरू अशा दुहेरी भूमिकेत होते. खूप खडतर असा प्रवास आणि त्यांची तितकीच खडतर तपश्चर्या. एकाहून अधिक गुरूंचा त्यांना लाभलेला स्वरदानाचा हात, त्यांची संगीतावरील अढळ निष्ठा आणि प्रेम यांचा ओघवता आणि तितकाच समर्पक संगीतमय आलेख वाचकांसमोर ठेवलेला आहे. याच ओघात लेखिकेचाही संगीत आणि अभिनयाचा प्रवास उलगडत जातो. संगीताविषयीची ओढ, नाटकात अभिनय करण्याची सहजता, रेल्वे ते एचएमव्ही – सारेगामापर्यंतची दौड, योजना प्रतिष्ठान, आषाढीवारी महोत्सव, अनेक दिग्गजांसोबत काम करण्याची मिळालेली संधी, 'अबू हसन' नाटकातला अभिनय प्रवेश, त्याचवेळी एक गृहदक्ष गृहिणी अशा अनेक भूमिका यशस्वीपणे साकारणाऱ्या अनेक रूपांत योजना शिवानंद या पुस्तकातून वाचकांच्या भेटीला येतात, तेही अगदी सहजपणे ओघवत्या प्रवाहात वाळूने प्रवाहासोबत यावे अशा पद्धतीने.

संगीताची उत्तम जाणच नव्हे तर संगीत रोमरोमी भिनलेल्या योजना शिवानंद संगीतातल्या अनेक छटा उलगडून दाखवतात. स्वरमंजूषेवर कसलेली बोटे जितक्या सफाईदारपणे नर्तन करतात तितकीच त्यांची लेखणी चौफेर मुशाफिरी करत आपल्याला संगीतक्षेत्रातल्या दिग्गजांची भेट घडवून आणते. त्यांच्या पूर्वाश्रमीच्या सप्रे नावावरून उस्ताद अब्दुल हलीम जाफरखान यांनी सुंदर कोटी केली आहे. 'सप्रे याने सापरे, सा प रे का मतलब हे षड्ज, पंचम और रिषभ... ये तीन सूर तेरे नाममें ही मौजूद है इसलिये तू तो हमेशा गायेगीही...'

या संग्रहात अनेक संदर्भ आहेत, जे दुर्मिळ फोटो आहेत. त्यामुळे हे पुस्तक म्हणजे संगीताचा खजिनाच म्हणावा लागेल. के. सय्यद यांनी सुंदर मुखपृष्ठ साकारले आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**




# ग्रंथपान

**नोबेलनगरी २०२०**
**सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते**




**ज्ञान–विज्ञानाची रंजक ओळख**

''काही रोग अनुवंशाने मिळालेल्या सदोष जनुकांमुळे होतात. जनुकीय कात्री वापरून असा सदोष जनुक काढून त्याच्या जागी निर्दोष जनुक बसवला की ती पेशी त्या रोगापासून मुक्त होऊ शकते. ज्या आई–वडिलांमध्ये एखादा आनुवंशिक रोग असेल, त्यांच्या भावी अपत्याचा आदिमपेशीमध्येच असा जनुकीय बदल केला तर होणारं अपत्य आनुवंशिक रोगांपासून मुक्त होईल.''

जगातला सर्वोत्तम पुरस्कार म्हणजे नोबेल पुरस्कार पुरस्कार. साहित्य, संशोधन, विज्ञान आदि क्षेत्रांतला सर्वोच्च आणि मानाचा पुरस्कार! साऱ्या जगाचे लक्ष लागलेल्या या पुरस्कारांची घोषणा होते तेव्हा मोजकीच मंडळी त्याची मानकरी ठरलेली असतात. परंतु त्यांच्या कर्तृत्वाची मोहोर त्या त्या क्षेत्रात कायमची नोंद करून जाते. अशा पुरस्काराची दखल घेऊन ती आपल्या वाचकांसाठी उपलब्ध करून देण्याचे मोठे कर्तृत्व थत्ते दाम्पत्य निष्ठेने करत आहे. साहित्य, अर्थशास्त्र हे विषय आपल्या आवाक्यातील आहेत, परंतु विज्ञान आणि त्याच्या विविध शाखा आणि त्या शाखांमधील सुक्ष्मातील सूक्ष्म शोध, या गोष्टी आपल्या केवळ आवाक्याबाहेरच्या असतात, असे नाहीतर त्या आकलनाच्या बाहेरच्याही असतात. परंतु हेच आकलन सोपे व्हावे याची काळजी घेत नोबेलनगरीची सोप्या सुटसुटीत भाषेत सफर करून आणण्याची किमया या दाम्पत्याकडून सातत्याने आणि तितक्याच तन्मयतेने होत आहे.

विज्ञान हा विषय सोपा करून सांगणे ही गोष्टी सोपी नाही. त्यासाठी त्यांनी कथानकाचे तंत्र स्वीकारले आहे. एक होते आटपाटनगर असे न म्हणता त्या त्य विषयानुसार नगरीची योजना केलेली आहे. 'जनुकीय' आणि 'वैद्यकशास्त्र' हे विषय शरीरशास्त्राशी निगडित आहेत. म्हणून 'अंगदेश', 'देहदेश', 'यकृतनगरी' भौतिकशास्त्रासाठी 'मंदाकिनी', 'आकाशगंगा' याप्रमाणे यात योजलेल्या पात्रांची नावेही मोठी मजेशीर आहेत. डोळ्स, पितृप्रकोपेश, जीव २४ तास, घणाघातसिंह, डॉ. कल्पक, दिगंतर अशी आशयाशी जोडलेली आहेत.

रसायनशास्त्राचे २०२०चे नोबेल पारितोषिक 'जनुकसमूह संपादन पद्धतीच्या विकासासाठी' इमॅन्युएल शार्पेटीए आणि जेनिफर ए. डौडना या संयुक्तपणे देण्यात आले आहे. 'डीएनएमधला एखादा जनुक कापून त्या जनुकामुळे कोणत्या कार्याचे नियंत्रण होते, हे शोधून काढणे आता शक्य झाले आहे.

शरीरशास्त्र किंवा वैद्यकशास्त्राचा २०२० हा नोबेल पुरस्कार हार्वे जे आयटर, मायकेल हॉटन आणि चार्ल्स एम. राईस यांना 'हेपटायटीस–सी' विषाणूच्या शोधासाठी संयुक्तपणे देण्यात आला आहे. या संशोधनामुळे हेपटायटीस–सी विषाणूची अत्यंत संवेदनशील रक्तचाचणी उपलब्ध झाली आहे. हेपटायटीस–सी हा रक्तसंक्रमणातून पसरत असल्यामुळे कोणत्याही रोग्याला रक्त देण्यापूर्वी त्या रक्तामध्ये हेपटायटीस–सीचे विषाणू नाहीत ना याची चाचणी करून खात्री करून घेता येईल.

भौतिकशास्त्राच्या २०२० च्या नोबेल पारितोषिकाचा अर्धा भाग रॉजर पेनरोझ यांना कृष्णविवर निर्माण होणे हे सापेक्षतेच्या सर्वसाधारण सिद्धांताचे एक साधार भाकीत आहे या शोधासाठी देण्यात आला. तर दुसरा अर्धा भाग संयुक्तपणे रॅनवार्ड जेन्झेल आणि ॲंड्रिया गेझ यांना आपल्या आकाशगंगेच्या मध्यभागी असणाऱ्या अतिविराट सघन वस्तूच्या शोधासाठी देण्यात आला.

या शोधांचा सोप्या भाषेत गोष्टीरूप केलेला उलगडा हा केवळ अभ्यासकांनाच नव्हे तर सामान्य वाचकालाही सहजसोपा वाटेल. तो विज्ञान मराठीतून सांगितलेला आहे. तसा इंग्रजीतूनही सांगितलेला आहे. त्यामुळे दोन्ही भाषा अवगत असणाऱ्यांची सोय झाली आहे. 'दोन माणसांच्या हाताचे ठसे जसे काही बाबतीत वेगवेगळे असतात तसे काही बाबतीत ते सारखेही असतात.' 'तुकड्यावरून विषाणूची ओळख पटवण्याचा हा प्रयत्न म्हणजे सुतावरून स्वर्ग गाठण्यासारखा होणार नाही का?' यांसारखी वाक्ये या सोपेपणात भर घालतात.

'भविष्यातही नवनवं संशोधन होण्यासाठी शास्त्रज्ञांच्या नवनव्या पिढ्या येत राहायला हव्या. भावी पिढ्यांच्या मनात संशोधनाची पाळंमुळं रुजावीत. यासाठीच नोबेलनगरीचा उपक्रम आहे.' अशा अपेक्षा लेखकांनी त्यांच्या मनोगतात आपल्या उपक्रमाविषयी व्यक्त केलेल्या आहेत. त्या प्रत्यक्षात उतरण्यात कुठली अडचण असल्याचे कारण नाही. त्या प्रत्यक्षात पाहण्यात या उपक्रमाचा वाटा नक्कीच असेल.

या पुस्तकाची निर्मिती खास वेगळ्या पद्धतीने केलेली आहे. त्याच्या सजावटीत चित्रांचा समावेश झाल्याने त्याचे रूप देखणे झालेले आहे. मुखपृष्ठावर संशोधनावर आधारित चित्रांची योजना केल्याने ते ते आकर्षक झाले आहे. चित्रकार सतीश भावसार यांची ही सुंदर कल्पकता म्हणावी लागेल.

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

## नाटक : एक मुक्त चिंतन
**रवीन्द्र लाखे**




**सत्य आणि स्वाभाविकतेपुढे धरलेला आरसा**

''नटाने स्वतःच्या मनाचा अभ्यास केला तर त्याच्या लक्षात येईल की आपणही मनाने काळे नि पांढरे दोन्ही आहोत. इथे अभ्यास ह्याचा अर्थ चोवीस तास जागे राहणे, स्वतःबाबत आणि जगाबाबतही. स्वतःच्या मनाच्या हालचाली आणि जगाच्या मनाच्या हालचाली ह्यांचे भान सदैव जागे हवे. ह्या मनातच आपले विचार, विकार स्पष्टपणे दिसून येतात.''

नाटक म्हटले की संहिता, नट, नेपथ्य, रंगभूषा, संगीत, प्रकाश, दिग्दर्शन, अशा घटकांचा सामावेश असलेला, रंगमंचावर सादर होणारा एक कलाप्रकार, अशी आपली एक ढोबळ समजूत. यात चूक आहे असे म्हणता येणार नाही. ही सगळी नाटकाची अभिन्न अंगे आहेत. परंतु या प्रत्येकात एक वाक्य अंगभूत विसावलेले असते. त्या प्रत्येक वेळी नव्याने जन्म घेतल्याचा जिवंत अनुभवाला सामोरे जाते. हे प्रत्येकात असलेले तत्त्व, त्यांना गुंफणारे सूत्र, यांचा सारखेपणाने अभ्यास करणे तर त्यातला आशय खऱ्या अर्थाने स्पष्ट होतो.

नाटकात नट आणि त्याचा अभिनय यांच्याविषयी प्रामुख्याने चर्चा होते. नटाने नाटकात संबधित पात्र रंगवताना स्वतःला वजा करावे लागते. जे. कृष्णमूर्तींच्या शब्दांत सांगयचे तर 'डोंट ट्राय टू बिकम, जस्ट बी' तुम्हाला गणपतराव बेलवलकरांची भूमिका मिळावी तर तुम्ही गणपतराव बेलवलकर होण्याचा प्रयत्न करू नका. तुम्ही गणपतराव बेलवलकर असा.

अभिनय म्हणजे आशयाच्या जवळ नेणे. 'अभि' म्हणजे कडे 'नय' म्हणजे शहाणीव, कथा किंवा प्रमुख विचार. भरताच्या नाट्यशास्त्राप्रमाणे 'सात्विक' 'वाचिक' आणि आंगिक आहार्य हे अभिनयाचे प्रकार आहेत. या प्रत्येकाची शुद्धता, संकल्पना, आत्मशोध या पुस्तकात स्पष्ट केलेले आहे.

नाटकाला एक सूत्रात बांधणारा दिग्दर्शक हा नाटकाचा प्रमुख घटक संहिता, तिचा आशय स्थळ-काल-पात्रे यांच्याविषयी त्यांचा दृष्टिकोन, संहितेतील शब्दांच्या पलीकडे असणारा दृष्टिकोन यांचा समन्वय साधून तो प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे हा मोठा प्रवास आहे. यात अभ्यास, चिंतन, मानसशास्त्राचा आधार यांचे महत्त्व किती आहे, हे एक कसलेला कल्पक दिग्दर्शकच ओळखू शकतो. दिग्दर्शकाला रंगमंचाचाही विचार करावा लागतो. इतर आवश्यक घटकांचा अनुरूप असा उपयोग करावा लागतो. त्या सगळ्यांच्या अनुभवावर आधारित एकेक पैलू प्रत्येक टप्प्यावर उलगडून दाखवलेला आहे.

नाटकासाठी 'तालीम' फार महत्त्वाची असते. नटांनी केवळ स्वतःच्या पात्राचे संवाद पाठ करून चालत नाही. मुळात नाटक समजून घ्यायला हवे. त्यासाठी किमान ते नाटक शंभर वेळा वाचायला हवे. तेव्हा नाटक कळतेच, परंतु संपूर्ण नाटक पाठ होते. नाटकाचा आशय, संवाद, त्यांची भाषा हेही महत्त्वाची असते. त्यांचा वापर कसा करायचा याचे उत्तम मार्गदर्शन हे पुस्तक करते.

'नटराज' हे प्रत्येक नाट्यकर्मीचे दैवत नटराजाची मूर्ती म्हणजे जगत-चालकाच्या कार्याचे कलेत व्यक्त होणारे सर्वात्कृष्ट दर्शन आहे. या नटराजाचे संपूर्ण वर्णन करताना कलावंत हा नटराजच असतो, तो एक जग निर्माण करतो नि चालवतो, असे साम्य दाखवून लेखकाने रंगकर्मीच्या केलेला तितकेच उच्चस्थान बहाल केलेले आहे.

नाटकाची संहिता ते रंगमंचावर सादर होणारा प्रयोग या प्रवासातल्या प्रत्येक टप्प्यावर एक अनुभवी दिग्दर्शक कसे चिंतन करतो, त्याचे सार म्हणजे 'नाटक : एक मुक्त चिंतन' हे पुस्तक होय.

रवीन्द्र लाखे ह्यांची खरी ओळख आहे ती दर्जेदार, संवेदनशील कयर म्हणून 'जिव्हार', 'संपर्कक्षेत्राच्या बाहेर', 'अस्वस्थांच्या कविता' हे त्यांचे गाजलेले दर्जेदार कवितासंग्रह. गेली चाळीस वर्षे ते रंगभूमीवर कार्यरत आहेत. पंचवीस नाटके आणि तीस एकाकिकांचे दिग्दर्शन त्यांनी कुशलपणे केलेले आहे. लघुचित्रपटातून अभिनय केला आहे. अनेक परीतोषिकांचे मानकरी ठरलेले रवीन्द्र लाखे प्रायोगिक संगभूमी, नाट्य कार्यशाळा शिवारे यातून अनेक गुणी कलावंताना घडवण्याचे कार्य करत आहेत.

नाटक या विषयाकडे गांभीर्याने पाहणे म्हणजे काय, याचा अनुभव हे पुस्तक वाचताना येतो. सखोल असे चिंतन या लेख मागे आहे. शेक्सपीयर, ग्रोटोव्हस्की, भरतभूमी, जे. कृष्णमूर्ती अशा अनेकांचे संदर्भ आहेतच, परंतु चं.प्र. देशपांडे, सानेकर, श्रीराम लागू यांचेही संदर्भ लेखकाचे अनुभव, अभ्यास आणि नाटक या विषयाचा ध्यास याची प्रचीती देतात. मानसशास्त्रीय शोधाची बैठक या लेखनाला आहे, यात भूमिका मार्गदर्शकाची आहे, परंतु भाषा सहज, सोपी आणि एका दिग्दर्शकाची आहे, त्याच्या वाचकाला निश्चितच उपयोग होईल. संदर्भमूल्य असलेला, संग्रही असावा असा ठेवा रवीन्द्र लाखे यांनी रसिकाच्या हाती दिलेला आहे.

दीपक घारे आणि सतीश भावसागर यांच्या कल्पकतेचे सार म्हणजे सुंदर मुखपृष्ठ!

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**माध्यमयात्रेतील माणसं**
**रविराज गंधे**




**आत्मरंग उलगडणारा 'माध्यमरंग'चा दुसरा टप्पा**

''आरसा हा माझा गुरू आहे. पुरुषभर उंचीच्या आरशासमोर मी आधी तालीम करतो. भूमिकेचा प्रथम स्वर शोधण्याचा मी नेहमी प्रयत्न करतो. जोपर्यंत तो सापडत नाही तोपर्यंत मी अस्वस्थ असतो. तो सापडताच त्याला धरून ठेवून मी बेअरिंग मजबूत करतो. अभिनयकलेची आत्मबल आणि आत्मविश्वास हीच महत्त्वाची शक्ती आहे असं मी मानतो.''

साहित्य, संगीत, चित्रपट, दूरदर्शन आणि वृत्तपत्र या माध्यमातून वावरणाऱ्या व्यक्तींविषयी आकर्षण आणि कुतूहल नाही असा माणूस विरळाच. या व्यक्तींभोवती असलेले लकाकणारे वलय हे रसिकांना आपल्या जाळ्यात इतके बेमालूमपणे ओढते की खुद्द रसिकालाही कळत नाही, आपण त्याचे चाहते झाले कधी आणि कसे? अशा माध्यमातील माणसांशी संपर्क, संवाद, प्रत्यक्ष भेट म्हणजे जणू दुधात साखर पडल्याचा आनंद. हा दुग्धशर्करा योग कुणाच्या नशिबी किती आणि कसा याचे मूल्यमापन करणे कठीण म्हणता येईल. परंतु रविराज गंधे याबाबतीत भाग्यवान आहेत, असे खात्रीने आणि अभिमानाने सांगता येईल. त्याची साक्ष देते ते त्यांचे नुकतेच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेले पुस्तक 'माध्यमयात्रेतील माणसं.'

रविराज गंधे हे उत्तम लेखक आहेत. 'माध्यमरंग' हे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले आणि अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेले त्यांचे पहिले, स्व-अनुभवाने नटलेले पुस्तक परंतु त्यापूर्वी केलेली पत्रकारिता, अनेक नियतकालिकांतून केलेले दर्जेदार लेखन, स्वत: नियतकालिके प्रसिद्ध करण्याचा घेतलेला अनुभव, यातून त्यांचे साहित्यिक पैलू उठावदार असल्याचे दिसून आलेले आहे. यात भर पडली ती त्यांच्या व्यावसायिक कर्तृत्वाची. खुद्द दूरदर्शनवरच 'निर्माता' या पदावर कार्यरत राहिल्याने त्यांची माध्यमातील अनेक प्रयोगांतून, त्यांच्या निर्मितीतून कारकीर्द बहरलेली दिसून येते. त्या कारकिर्दीतील माध्यमातील थोर व्यक्तींशी त्यांना थेट संवाद साधता आला. स्वत:च्या कलागुणांशी त्यांना जुळवून घेता आले, ही एकप्रकारे चार चांद लागलेली कारकीर्द आहे असेच म्हणता येईल.

दूरदर्शनवर त्यांचे स्वत:चे निर्मित केलेले अनेक कार्यक्रम लक्षवेधी ठरले. त्यात 'अमृतवेल'ने कळस गाठला. हा लोकप्रिय कार्यक्रम ही त्यांची सर्वोत्तम निर्मिती ठरली, तशी ती रसिकांच्या स्मरणात कायम स्थान राखून आहे. त्या कार्यक्रमातील काही, नियतकालिकांसाठी काही घेतलेल्या मुलाखतीच्या माध्यमातून निवडक दिग्गज असे कलावंत या पुस्तकातून भेटीला आलेले आहेत.

कलावंत हा कुठल्याही माध्यमातील असू दे, त्याचे संपूर्ण दर्शन त्याच्या मनोगतातून मोकळे करील, अशी अपेक्षा करणे म्हणजे दगडाला पाझर फोडण्यासारखे आहे. परंतु रविराज गंधे यांनी त्यांच्या थेट अंत:करणाला हात घातलेला दिसून येतो. मधाच्या पोळ्यातील थेट मधाच्या गाभ्याला हात घातल्यासारखा. इतिकर्तव्याचा हा मध हस्तगत करायचा तर त्यासाठी सारे कौशल्य पणाला लावावे लागते. मुलाखतीचे तंत्र ही साधी-सरळ बाब वाटत असली तरी ती तशी वाटणे ही फसगत आहे. ज्याची मुलाखत घ्यायची त्याची नुसती कारकीर्द समजून घेऊन चालत नाही, तर संपूर्ण व्यक्तिमत्त्वच समजून घ्यावे लागते. सायीसारखे सार नेमकेपणाने घुसळून काढावे लागले, तेही कुठे ओरखडा न उमटता. ते कौशल्य रविराज गंधे यांच्याकडे आहे. ते त्यांच्या लेखणीतून, प्रसन्न शैलीतून व्यक्त झालेले आहे. त्याचेच सार म्हणजे 'माध्यमयात्रेतील माणसं' हे पुस्तक होय.

'माध्यमयात्रेतील माणसं' याची विभागणी चार भागांत केलेली आहे. 'सिनेमा जगत' या पहिल्या भागात सुलोचना, मास्टर भगवान, नाना पळशीकर, दारासिंग, गजानन जहागीरदार आणि शाहू मोडक आहेत. दुसरा भाग 'संगीत जगता'चा आहे. यात जगजितसिंग, बेगम परवीन सुलताना यांचा समावेश आहे. 'दूरदर्शन'च्या तिसऱ्या भागात पु.ल. देशपांडे, सई परांजपे, कमलेश्वर आणि विजय तेंडुलकर आहेत. तर चौथा 'साहित्य जगत'. या भागात बा.भ. बोरकर, रामदास भटकळ, मंगेश पाडगावकर, चंद्रकांत खोत, दिलीप प्रभावळकर, बाबूराव अर्नाळकर, श्रीकांत बोजेवार, मोनिका गजेंद्रगडकर आणि कमल शेडगे यांचा समावेश आहे.

या सर्व मान्यवरांच्या मनमोकळ्या अशा मुलाखती या पुस्तकात आहेत. त्यात मुलाखत देणाऱ्या मान्यवराचे व्यक्तिमत्त्व कायम राहील, त्यात कुठेही मुलाखतकाराचा अनाठायी हस्तक्षेप असणार नाही याची तंतोतंत काळजी लेखकाने घेतलेली आहे. त्यामुळे दोघेही आपल्यासमोर संवाद साधत आहेत आणि आपण प्रेक्षक-वाचक म्हणून ती तशीच्या तशी अनुभवत आहोत असेच वाटत राहते. लेखकाची स्वत:ची एक शैली असते. तिचा प्रत्यय मुलाखतीच्या समोरापातून येतो. ''चालण्याच्या ओघात आपल्या खांद्यावर जन्मभर वागवलेली छोटी-मोठी भावभावनांची, आठवणींची गाठोडी बऱ्याचदा माणूस मुक्कामाला पोहोचल्यावरदेखील उतरवायची विसरतो अन् अचानक कुठल्यातरी निमित्ताने तो ती हळूहळू खांद्यावरून उतरवायला लागतो अन् मोकळाढाकळा होतो.'' अशा वाक्यातून रविराज गंधे व्यक्त होतात.

पुस्तकाच्या सुरुवातीस लेखकाचे मनोगत आहे, ती त्यांच्या प्रवासाची नांदी म्हणता येईल. आतील फोटो हे त्यांच्या कारकिर्दीवर चांदतारे आहेत आणि सतीश भावसारांचे मुखपृष्ठ हे या पुस्तकाचे अवकाश साधणारी आकाशगंगा आहे.

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**कॉर्पोरेट कविता**
**प्रथमेश पाठक**




**उगवतीचे इंद्रधनुषी रंग ल्यालेली कविता**

आम्ही छंदोबद्ध कविता फक्त रविवारीच लिहितो कारण
त्या दिवशी फुरसत असते अलंकार आणि
छंदात मनसोक्त डुंबायची.
एरवी आठवडाभर फक्त गर्दी
रस्त्यात माणसांची आणि कवितेत शब्दांची.

प्रथमेश पाठक यांचा 'कॉर्पोरेट कविता' असे शीर्षक असलेला नवाकोरा कवितासंग्रह. त्याच्या शीर्षकाच्या नावीन्यातून हे स्पष्ट होते की हा संग्रह वर्तमान जगाचे वास्तव आपल्या कवेत घेऊन आलेला आहे. कॉर्पोरेट जग ही वर्तमानाची व्याख्या झालेली आहे. या जगात माणसे वावरतात ती यशाच्या भूमिकेतून. त्यासाठी आणखी एक शब्द प्रचलित झालेला आहे, ब्रेन ड्रेन! कवीच्या भाषेतच सांगायचे तर या ब्रेनचे दोन भाग आहेत, डावा आणि उजवा, जे जगण्यावरील आपली हुकूमत आणि यांत्रिकता सिद्ध करतात. नेमके हेच मुखपृष्ठावरील सजावटीत अचूकपणे हेरलेले आहे. यासाठी मुखपृष्ठकार तेजस्विनी प्रथमेश पाठक यांचे अभिनंदन करायला हवे.

हा कवितासंग्रह वाचत असताना एक वेगळी भूल मनाभोवती रुंजी घालत असल्याचा भास होतो. पर्यटनस्थळी गेल्यानंतर जाणवणाऱ्या आनंददायी, प्रसन्न, कुतूहल आणि आश्चर्य यांच्या भुलीसारखी. प्रत्येक स्थळ वेगळे भासावे, पुन्हा पुन्हा चहूबाजूंनी पाहण्याचा मोह व्हावा, तिथेच रेंगाळत राहावे, त्याच्या सौंदर्यात अंगभर चिंब भिजावे, ही नि एक आकर्षक मोहिनी मनाला तिथे बांधून ठेवते, तसाच अनुभव या कविता वाचताना येतो. प्रत्येक कविता स्वतंत्र आहे. तिचे विषय, आशय आणि त्यातले सौंदर्य स्वतंत्र आहे. शीर्षकात 'कॉर्पोरेट' अशा शब्दप्रयोग आहे. पण हे जग म्हणजे एक प्रिझम आहे. त्यातून दिसणारे, भासणारे विश्व खूप मोठे आहे आणि तितकेच वेगळे आहे. हे वेगळेपण केवळ दिखाऊ नाही तर भरभक्कम अशा आशयघन शब्दांच्या कलाकुसरीतून ते साकारलेले आहे. 'क्षितिजाची वास्तुशांत केली नाही की असं होतं का?' 'मी नसतोच कधी जातीच्या कॅमेरातून काढलेल्या फोटोत, पण पूर्वग्रहदूषितांच्या फोटोशॉपचं काय करू?' 'जणू मी तुझ्या वक्षछंदाप्रमाणे उषेच्या समेवर अचुक चालली' यासारख्या ओळी प्रत्येक कवितेच्या गाण्यात चिरेबंदी पायाभरणीच्या माथ्यावर अलगद पाय रोवून उभ्या असलेल्या आढळतात आणि वाचक म्हणून आपण तिथेच त्या पायरीशी उभे राहतो, स्तब्ध होऊन.

कविता ही कवीची आहे. तिच्याविषयी तो भरभरून बोलतो. हे बोलणे कवितेच्या प्रसूतिवेणांचे आहे तसे ते कवीच्या अस्वस्थपणाचे आहे. 'मध्यरात्री ये कुजबुज कानी की पानांची सळसळ न्यारी। नसते कुजबुज, नसते सळसळ असतो आक्रोश झाडावरी'.

कवी आपल्या भोवतीचे जग कवितेतून मांडतो तेव्हा त्याचे संवेदनशील स्पंदन, तरल निरीक्षण आणि थेट आशयाला भिडण्याची दमदार ऊर्जा यांचा प्रत्ययकारी अनुभव देतो. समुद्राचे अफाट उधाणलेले रूप आणि निश्चल ओहोटीच्या वेळचे रूप ही दोन टोके जशी प्रत्ययाला येतात तशा. यात असणारा विरोधाभास, विसंवाद आपल्याला स्तब्ध करून जातो. 'रिप्लेस' ही कविता 'शब्दा'ला मध्यवर्ती ठेवून लिहिलेली आहे. तिच्या शेवटी कवीने एक ओळ जोडली आहे, 'आता शब्दाऐवजी 'माणू' रिप्लेस करून हीच कविता पुन्हा एकदा वाचा' अशी क्षणात सगळे संदर्भ बदलून आपल्याला कवेत घेतात. जसे हस्तांदोलन करत नाही, थेट मिठीच मारतात.

आशयसंपन्न असलेल्या या कविता काही मुक्तछंदात आहेत, परंतु त्या विस्कटलेल्या नाहीत, तर त्यांना तरल अशी लय आहे. काही कविता छंदबद्ध आहेत. त्यासाठी यमक, अलंकार जोडण्याची धडपड नाही तर अंगभूत अशी सहजता त्यांच्यात आहे. 'एकदा कवितेत ये तू', 'नाही'सारख्या काही कविता गझलच्या रूपात आलेल्या आहेत.

एकदा कवितेत ये तू एकदा तर शब्द हो
ही मिठी सुटण्याअगोदर एकदा तर स्तब्ध हो

'ऑफिससूक्त', 'कवितेबाहेरचा पाऊस' यासारख्या काही कविता अभंगाचे बोट धरून आलेल्या आहेत. चार ओळींचे कडवे हा एक आणखी प्रकार आहे जो 'हायकू'चे स्मरण करून देतो.

कवी प्रथमेश पाठक यांच्या कविता यापूर्वी दर्जेदार अशा नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांचा पुस्तकरूपाने हा पहिलाच संग्रह आहे तरी त्यात नवखेपणाला कुठे थारा नाही. ही आजची कविता असल्याने इंग्रजी शब्दांची योजना अपरिहार्य ठरते. मार्केट, रिझोल्युशन, स्केल, स्टँडर्ड, कॉम्पिटिटर, सेफ्टी डोअरसारखे अनेक इंग्रजी शब्द कवितेत आले आहेत. तशी शीर्षके– कॅलिडोस्कोप, नॉस्टॅल्जिया, इंटरेस्ट, रिप्लेस अशी इंग्रजी आहेत. हा सगळाच संग्रह पुन्हा पुन्हा वाचावा असा दर्जेदार आहे. यातील समई, जाणीव, फोटोशॉप, वाळवी, गंज, चंद्र, आमची कविता यांसारख्या काही कविता कायम स्मरणात राहतील इतक्या उल्लेखनीय आहेत.

डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना आणि प्रशांत असनारे याचे अर्कसार असलेले ब्लर्ब म्हणजे या संग्रहाचे अलंकार आहेत.

**मूल्य १५० रुपये   सवलतीत ९० रुपये**




# ग्रंथपान

**व्यासंग आणि विचार**
**धनंजय गांगल, अरुण जोशी**




## तुफानाचे सौंदर्य आणि सामर्थ्य लाभलेला लेखसंग्रह

''तत्त्वज्ञानाच्या किंवा विचारसरणीच्या 'संशोधना'ला प्रयोगशाळा लागत नाहीत, अंतराळाने किंवा दुर्बिणी लागत नाहीत, रसायने लागत नाहीत, तंत्रज्ञान लागत नाही; की कुठे उत्खनन करावे लागत नाही. मनाचे, अंतर्मनाचे उत्खनन, सर्वेक्षण, पृथक्करण, संशोधन मनानेच करायचे असते.. म्हणजेच 'द ऑब्झर्व्हर' आणि 'द ऑब्झर्व्हड' एकच. निरीक्षक आणि निरीक्षण केले जाणारे मन हे दोन्ही एकाच माणसाच्या ठायी!''

कुमार केतकर हे व्यासंगी पत्रकार-संपादक म्हणून सर्वांनाच परिचित आहेत. इकॉनॉमिक टाइम्स, डेली ऑब्झर्व्हर, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, दिव्य मराठी आदी मराठी-इंग्रजी वृत्तपत्रे त्यांच्या कुशल, व्यासंगी संपादकीय कारकिर्दीची साक्षीदार आहेत. उत्तम वक्ता कसा असावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे कुमार केतकर. मंत्रमुग्ध करणारी अस्खलित ओघवती वाणी, तारीख-सनावळीसह असलेले ठाशीव संदर्भ आणि त्यामागे असलेला प्रचंड अभ्यासाचा भक्कम पाया, त्यामुळे त्यांचे वक्तृत्व ऐकणे ही एक पर्वणीच. त्यांची जी मते असतात ती ठाम आणि आशयसंपन्न असतात. त्यांच्या विचारांत असलेली प्रगल्भता ही तर दिपवून टाकणारी असते. ती केवळ भाषणातून व्यक्त होते असे नाही तर त्यांच्या लेखनातूनही ती तितक्याच उत्कट आणि तरलपणे व्यक्त होते. त्यांच्या प्रतिभेला तर दैवी देणगीच लाभलेली म्हणायला हवी. बदलते विश्व, त्रिकालवेध, ओसरलेले वादळ, एडिटर्स चॉईस, विश्वामित्राचे जग, शिलंगणाचे सोने, मोनालिसाचे स्मित, कथा स्वातंत्र्याची, ज्वालामुखीच्या तोंडावर आदी पुस्तके वाचत असताना या दैवी प्रतिमेचा, व्यासंगाचा पदोपदी प्रत्यय येतो. त्यांच्या प्रसिद्ध असलेल्या या श्रेष्ठतम साहित्यसंपदेतून वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या लेखांतून काही निवडक लेख संकलित करून त्यांचा एक सुंदरसा लेखगुच्छ तयार करण्यात आला आणि त्यांच्या पंचाहत्तरीच्या निमित्ताने तो कुमार केतकर यांना अर्पण करण्यात आला आहे, त्याचे नाव आहे व्यासंग आणि विचार. हे संकलन चोखंदळपणे केले आहे धनंजय गांगल आणि अरुण जोशी यांनी. ग्रंथालीच्या स्थापनेत आणि तिच्या वाटचालीत सक्रिय सहभाग असलेल्या संस्थापक-सदस्य कुमार केतकरांना ग्रंथालीने दिलेली ही कृतज्ञतेची नव्हे तर आपलेपणाची, अंतर्यामी जिव्हाळ्याची गौरवभेट आहे. धनंजय गांगल हे ग्रंथालीचे विश्वस्त आहेत आणि अरुण जोशी ग्रंथालीचे संपादकीय आधारस्तंभ आहेत. दिनकर गांगल, अरुण साधू, कुमार केतकर यांनी ग्रंथाली वाचक चळवळ वृद्धिंगत करण्याचा जो वारसा निर्माण केला, तो अव्याहतपणे-समर्थपणे पुढे सुरू राहिला आहे, त्यात सुदेश हिंगलासपूरकरसह या द्वयींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्याची प्रचीती या पुस्तकाच्या संकलनातून व संपादनातून येते.

'व्यासंग आणि विचार' या लेखसंग्रहाचे वेगळेपण अनुक्रमणिकेवरून नुसती नजर फिरवली तरी लक्षात येईल. विज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थकारण, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, इतिहास, साहित्य, माध्यम, व्यक्तिचित्रण अशा सर्व घटकांचा समावेश असलेले लेख निवडलेले आहेत. हे लेख पूर्वप्रसिद्ध आहेत, आपण वाचलेले आहेत म्हणून ते शिळे झाले आहेत, असा समज करून त्यांच्यापासून फारकत घेतल्यासारखे होईल. याचे कारण कुमार केतकरांची शैली, त्यांचा व्यासंग, त्यांनी प्रत्येक लेखात केलेले विषयाचे विश्लेषण, उलगडून दाखवलेली अंतर्बाह्य सुसूत्रता आणि त्यापाठी असलेले तत्त्वज्ञान व मानसशास्त्र. त्यामुळे हे लेख नुसते ताजेपणाचे अनुभव देतात इतकेच नाही तर आपल्या आकलनाच्या जाणिवा समृद्ध करत जातात. प्रत्येक लेखाची कक्षा किती विस्तृत असू शकते, त्याच्या विविध पैलूंचा विचार वेगवेगळ्या दृष्टिकोनातून कसा करता येतो; हे लेख वाचताना नव्याने जाणवत जाते.

रसेल, फ्रॉईड यांची ओघात आलेली नुसती नावे संदर्भापुरती मर्यादित नाहीत, तर त्यांची त्या त्या विषयावरील पुस्तकांची नावे, त्यांचा लेखाशी असलेला अन्वयार्थ वाचून आपण थक्क होतो. गॉडफादरचा लेखक मारिआ पुझो याचे कादंबरीलेखन, अरुण साधू, नारायण सुर्वे, विजय तेंडुलकर, सुनीता देशपांडे, आळेकरांचे महानिर्वाण, हिटलर, महात्मा गांधीजी यांच्याविषयीचे लेख व्यक्तिचित्रणाची आदर्श संहिता म्हणावी असे आहेत. स्वत:ला लेखक म्हणवणाऱ्या साहित्यिकांनी या लेखांकडे गाईड म्हणून एकदा निश्चितपणे पाहणे उपयुक्त ठरू शकेल. नोकरशाही अभिमानाने बाळगणाऱ्यांनी वेतनव्यवस्थेवरील वास्तव समजून घेण्यासाठी 'वेतनव्यवस्थेतील बेबंदशाही' हा लेख आवर्जून वाचावा. आणि रसिक वाचकांसाठी तर प्रत्येक लेख ही जणू केतकरांची पंचाहत्तरीच्या निमित्ताने मिळालेली भेट आहे; असेच म्हणता येईल. यातून वाचनासाठी उपयुक्त ठरू शकतील अशा अनेक पुस्तकांची यादी हाती येईल.

''एकदा तडजोडी सुरू केल्या की त्यांची परिणती निष्ठेच्या लिलावात आणि भ्रष्टाचारात व्हायला फारसा वेळ लागत नाही,'' ''आणि त्या अधिकाऱ्याचा चेहरा अगदी आवाज ऐकू येईल इतका धपकन् पडला'', ''कोणत्याही प्रसन्न, उमद्या, उत्साही, हसतमुख, करिष्मासंपन्न व्यक्तीची हत्या वा अपघाती मृत्यू ही लोकांच्या काळजावर जखम करते.'' यासारखी अनेक वाक्ये ही सहजासहजी येत नाहीत. त्यासाठी प्रज्ञा, प्रतिभा, प्रगल्भता आणि व्यासंग असावा लागतो. ती सारी आयुधे ज्यांच्याकडे आहेत त्यांचे नाव आहे कुमार केतकर. 'व्यासंग आणि विचार' हे त्याचे सार आहे, जे वाचकाच्या वैचारिकतेला नक्की उद्युक्त करील असा विश्वास वाटतो.

धनंजय गांगल यांची उत्तम प्रस्तावना आणि सतीश भावसार यांचे आशयसंपन्न मुखपृष्ठ या पुस्तकाला लाभलेले आहे.

**मूल्य २५० रुपये   सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ओव्या

**अनुपमा निरंजन उजगरे**




**लोप पावत चाललेल्या लोकसाहित्याचे अक्षररूप**

खेळू नको भातुकली झुळू नको झोका बाई
खेळाखेळातला कसा तुला सांगू धोका बाई

'ओवी' हा एक साधासरळ साहित्यप्रकार, दोन ओळींत सगळा आशयाचा आवाका सावरून धरलेला. अभंग, गझलेचा शेर, पद, रुबाया यांच्या पंक्तीला वसलेला. तरीही स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व जपलेला. भक्तिमार्गातला जवळचा, जिव्हाळ्याचा आणि थेट देवाशी संवाद साधण्याचा सहजसोपा मार्ग. 'पाळणा' याच्याशी सलगी सांगणारा हा साहित्यप्रकार आपला सांस्कृतिक ठेवा आहे. तो अनेक तऱ्हेने व्यक्त झालेला दिसून येतो.

उषेची प्रभा अवतरण्यापूर्वी, पक्ष्यांचा किलबिलाट सुरू होण्याआधी जात्याच्या घरघर संगीतावर घरातली माऊली स्वत:शीच एकटीच संवाद साधायची.

पहिली माझी ओवी नाही गाण्याचा आळस
तारक येशू ख्रिस्त माझ्या जिण्याचा कळस

या ओव्यांमध्ये देव येतो. दिवसभराचा दिनक्रम येतो. आई, वडील, बहीण, भाऊ या माहेरच्या माणसांची गुंफण येते. सासू, सासरा, नणंद, जावा, दीर यांचा गोफ उलगडत जातो. शेत, समाज यांची वर्णने येतात.

शेतात ग माझ्या बाच्या भरल्या इहिरी
मोट हाकिती गडी बैल ढवळे खिल्लारी

जात्यावर दळणे ही एकेकाळची अपरिहार्य अशी निकड होती. संपूर्ण कुटुंबासाठी भाकऱ्या थापायच्या तर तेवढे पीठ हवे. त्यासाठी कुटुंबातली सून जात्यापाशी बसायची. दगडाचे नाते, सूप भरून दाणे आणि ती. दळण आणि ओव्यांची सोबत. जात्यातून पीठ पाझरत राहते ओव्यांच्या नादात, असे एकेकाळचे चित्र घराघरात दिसायचे. आज काळ बदलला. परिस्थिती बदलली. जाते गेले, ओव्या गेल्या. एका सांस्कृतिक ठेव्यापासून आज आपण खूप दूर आलो आहोत. लोकजीवन, लोकसाहित्य यातला एक घटक आपल्यातून वेगळा झाला याची कोणाला ना खंत ना खेद! परंतु आजही काही सजग प्रतिभासंपन्न मंडळी, भलेही ती मोजकीच आहेत, आपल्या या ठेव्याला जतन करण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहेत. त्यांच्यापैकी एक आहेत डॉ. अनुपमा निरंजन उजगरे!

डॉ. उजगरे यांचा खरा परिचय आहे तो एक तरल, संवेदनशील कवयित्री म्हणून. 'सांगी', 'पश्चात' हे त्यांचे दर्जेदार कवितासंग्रह. परंतु याशिवायचा त्यांचा एकूण लेखनप्रवास थक्क करणारा आहे. कथा, वैचारिक लेख, ललित, चिंतन, चरित्र, अनुवाद, संपादने आदींची जवळपास पस्तीस प्रकाशित पुस्तकांची उत्तम साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. अनेक पुरस्कारांनी त्यांच्या या कसदार लेखनाचा गौरव केलेला आहे. 'ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ओव्या' हा याच परंपरेतील उत्तम संकलन आणि संपादन असलेला संग्रह आहे.

संशोधन आणि चोखंदळपणाचे दर्शन घडवणारा हा संग्रह विविधतेने नटलेला आहे. 'जात्यावरच्या ओव्या' हा मौखिक वारसा जपणारा साहित्यप्रकार. लिखित स्वरूपात त्याचे अस्तित्व अगदीच नगण्य. आज जात्याला मागे पडून पन्नास वर्षांचा काळ उलटून गेला आहे. ज्या कुणी ओव्या म्हणत त्यांची वानवा असणे तर गृहीतच धरायला हवे. अशा प्रतिकूल परिस्थितीत ही बिकट वाट तुडवत ईप्सितापर्यंत पोहोचणे म्हणजे अग्निदिव्यच म्हणायला हवे. परंतु जिद्द, ध्यास आणि अथक परिश्रम करण्याची तयारी यांच्या जोरावर ही नौका पैलतीरी पोच झाली, यासाठी डॉ. अनुपमा उजगरे यांचे अभिनंदन करायला हवे.

शीर्षकात 'ख्रिस्ती' हा शब्द आला आहे, त्यामुळे दचकून जाण्याचे कारण नाही. ख्रिस्ती धर्मात गेलेला समाज हा याच मातीतला मूळ समाज आहे. धर्म बदलला तरी जीवनरहाटी तीच राहिली आहे. त्यामुळे या ओव्या याच मातीतून उगवलेल्या आहेत, हे ध्यानात घ्यायला हवे. दिनक्रम, दळण, मायलेकरू, मायलेक/बापलेक, जावई, बहीण-भाऊ-भावजय, पती-पत्नी, दीर-जाऊ-नणंद ही नाती धर्म बदलला तरी तीच राहिली आहेत. फरक झाला तो येशू आणि बायबल या दोन शब्दांचा. त्यामुळे हा ठेवा समग्र ओवीसाहित्यापासून वेगळा काढणे कठीण आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर भटकंती करून सिद्ध केलेल्या संग्रहात त्या त्या प्रादेशिक भाषेचे सौंदर्यही त्यांनी उजेडात आणलेले आहे. संपादन, मांडणी, विषयवार वर्गवारी, ही जिकिरीची कामे, परंतु अतिशय निगुतीने ही जबाबदारी त्यांनी पार पाडल्याची कबुली द्यायला हवी, हा संग्रह त्यांच्या या जबाबदारीचा साक्षीदार ठरतो. जवळपास अकराशे ओव्या उपलब्ध झाल्या त्यांची संगतवार नोंद त्यांनी विषयवार दिलेली आहे. अर्थ-टिपा दिलेल्या आहेत. त्यामुळे हा संग्रह संदर्भग्रंथाचे मोल सिद्ध करतो. ''घराघरातून आता जातं जात चाललंय, पण ओव्यांची तरी 'अक्षर' राहाव्यात ह्या इच्छेने जात्याचा खुंटा मी हाती धरला.'' या शब्दांत त्या आपली भूमिका स्पष्ट करतात. त्याचे हे संशोधन आणि संकलन नक्कीच अक्षर राहील असा विश्वास वाटतो.

डॉ. तारा भवाळकर यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे. त्यांनी केलेले कौतुक डॉ. अनुपमा उजगरे आणि या संग्रहाचे स्थान अधोरेखित करणारे आहे.

आशयाला संपन्नतेची जोड देणारे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवलेले आहे.

**मूल्य १८० रुपये सवलतीत ११० रुपये**

# ग्रंथपान

**माझ्या दृष्टातांची दृश्ये**

**चंद्रशेखर सानेकर**



**एक दवाचा थेंब; त्यात ताऱ्यांचा महाल आहे**

*विलाप कानी पडतो आहे कुठेतरी ढग रडल्याचा*

*कुठेतरी आचके देत चुपचाप मरत असणार झरा!*

'माझ्या दृष्टांताची दृश्ये' हा चंद्रशेखर सानेकर यांचा सहावा गझलसंग्रह. त्याचे शीर्षकच संग्रहाचे सार सांगून जाते. कवी हा द्रष्टा असतो. साक्षात्कार झाल्याशिवाय तो प्रकटत नाही. त्याचे प्रकटणे हे त्याच्या अंतर्यामी साचलेल्या संचिताचे धन असते. हे संचित त्याने कल्पिलेल्या, अनुभवलेल्या अनुभूतीला पारखून, जोखून स्थायी आलेले असते. तेच तो शब्दांतून मांडतो तेव्हा त्याचे रूप लौकिक अर्थाने काव्य असते, परंतु प्रत्यक्षात तो त्याचा परीसस्पर्शित अंतरीचा हुंकार असतो. हा हुंकार क्षितिजाला स्पर्श करून आलेला असतो. मातीच्या गंधाने माखलेला असतो. मनोव्यापाराच्या हेलकाव्यांनी हिंदळकलेला असतो, जगरहाटीच्या वणव्यातून होरपळलेला, तावून-सुलाखून निघालेला असतो. अनंताच्या ठायी असलेल्या ग्रहताऱ्यांसारखा ठिकऱ्या-ठिकऱ्यांतून भिरकावलेला असतो. असे सारे असूनही त्याचा तो अचल, अक्षर स्वर असतो. जसा रापलेला अनुभूतीसंपन्न हुंकार प्रत्येक शेरातून व्यक्त झालेला वाचायला मिळतो तो या गझलसंग्रहातून, ज्याचे नाव आहे, 'माझ्या दृष्टांताची दृश्ये'.

प्रत्येक शेर स्वतंत्र असतो, हे गझलेचे वैशिष्ट्य असते. परंतु ते केवळ तंत्र आहे असे सांगून चालत नाही. त्याचे अस्तित्व दृश्य स्वरूपात प्रत्यक्ष साकारलेले असावे लागते. तो अनुभव हा संग्रह देतो.

*सैतानाचे काम तसे तर देवाचे कौशल्य असे*

*सुऱ्यासारखे मोरपीस तर पिसासारखा सुरा फिरे*

चंद्रशेखर सानेकरांची गझल एक मोठा व्यापक असा अवकाश उभी करते. तिचा आवाका स्वकेंद्रित परिघाला भेदून सर्वसमावेशक अशा विशालपटलाच्या अंत:करणाला हात घालतो, त्याला उलगडून दाखवतो.

*गरिबांच्या डोक्यावर इतक्या दु:खाचे का ओझे*

*हा जो ईश्वर आहे तो कोणाचा हमाल आहे?*

काळ आणि दुनिया ही सतत स्थित्यंतरे दाखवणारे, माणसाला आशेवर ठेवून अचानक चकवा देणारे. तरी प्रत्येकाच्या आयुष्याला व्यापून टाकणारे सजग घटक. हे दोन्ही या संग्रहात अनेक रूपांत आपल्या भेटीला आलेले आहेत. बदल हा त्यांचा स्थायिभाव असल्याने प्रत्येक टप्प्यावर त्याचे अस्तित्व वेगवेगळे भासत राहते. हे भासणे अनुभवाच्या अंगाने असते, परंतु त्याकडे कवी कोणत्या कल्पकतेने पाहतो, हे पाहणे कुतूहलाचे ठरते.

*दुनिया इतकी भरदिवसा झगमगते का?*

*झगमगते तर रात्री काळी पडते का?*

व

*दुनियेची मोडतोड पाहून सवाल त्याला केला तर*

*काळ म्हणाला, 'माझ्यापाशी नवे युगांतर आहे ना!*

शेत, शेतकरी, दुष्काळ हेही विषय गझलेत सामावलेले आहेत. ऊन, वारा, सावली, ऋतुमानाचे बोट धरून आलेले आहेत. गरीब-श्रीमंत, उजेड-अंधार, शासन आणि जनता असे परस्परविरोधी, असमांतर अंतर पार करताना सानेकरांची गझल कधी धारदार होते, वर्मावर घाव घालते, निर्भीडपणे-ठामपणे व्यक्त होते. वास्तवाच्या विस्तवाला राखेपासून मुक्त करू पाहते. ढोंग, लबाडी, फसवणूक, चालढकल याविषयी चीड अस्वस्थ करून जाते तेव्हा सरळ थेट आव्हान देते, तर कधी दवाच्या अंत:करणात ताऱ्यांचा महाल अलवारपणे उभी करते. 'भग्न आस्थेचे तुकडे' या त्यांच्याच कवितासंग्रहाचे स्मरण हा गझलसंग्रह वाचताना होत राहते.

चंद्रशेखर सानेकर हे आजच्या पिढीतले एक उत्तम गझलकार म्हणून ओळखले जातात. 'एका उन्हाची कैफियत', 'एका शहराच्या खुंटीवर', 'नभाशी बोलण्यासाठीच', 'माझ्या काळाचा अनुवाद', 'एक अजब कोलाहल' हे त्यांचे प्रकाशित गझलसंग्रह. प्रसिद्ध गीतकार असा लौकिक असलेल्या सानेकरांच्या गाण्यांच्या पन्नासहून अधिक सीडी व अल्बम प्रकाशित आहेत. उत्कृष्ट गीतकार म्हणून 'झी अल्फा'चे दोन वेळा नामांकन लाभलेले आहे.

गझलतंत्राची उत्तम जाण असलेल्या सानेकरांची गझल उत्तम शब्दकळेने नटलेली आहे. तिची धार लखलखणारी आहे तसा तिच्यातला सहजपणा भावणारा आहे. शाब्दिक करामती करून मंचीय प्रतिसादाचा सोस यापासून ती दूर आहे, म्हणून ती स्वतंत्र आणि खणखणीत आहे. त्यांनी स्वत:च म्हटले आहे,

*आजवरी जे लिहिले ते ते केले एका शिडीसारखे*

*पायतळी ज्ञाताला घेऊन अज्ञाताला बघण्यासाठी*

या गझलसंग्रहाचे शीर्षक 'माझ्या दृष्टांताची दृश्ये' असे असल्याने आतील गझलांना वेगळी शीर्षके नाहीत. एकूण सत्तावन्न गझल आणि संपूर्ण गझल भासावी असे अठरा शेर या संग्रहात आहेत. एक चांगला उमदा गझलसंग्रह वाचल्याचा आनंद हा संग्रह देतो.

चंद्रकांत गणाचार्य यांनी आशयसंपन्न असे मुखपृष्ठ सजवले आहे.

**मूल्य १५० रुपये   सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

## पिठाई ते पिटवे
**शुभांगी पाटील**




**इया इया हाता रळीयामना**

''जीवन असेच असते. लोक आपल्या जीवनात येतात आणि निघून जातात. काहीही आठवण राहते, काहींना आपण विसरूनही जातो. आपणही किती लोकांच्या स्मरणात राहत असणार आणि लक्षात राहिलो तरी चांगल्या कारणासाठी राहिले पाहिजे.''

आयुष्यात यशस्वी होणे, गरिबीतून श्रीमंत होणे, तळागाळात सर्वसामान्यातील दुर्लक्षित एक असण्यापेक्षा पृष्ठभागावर येऊन स्वत:ची ओळख निर्माण करणे, अशी मनीषा कुठल्याही माणसाच्या मनात असणे स्वाभाविक ठरते. परंतु अशा स्वप्नांच्या रथावर स्वार होऊन 'जिंकणारच' अशी जिद्द, ध्यास मनात बाळगून तिला परिश्रम आणि प्रयत्नांचे पंख जोडणे वेगळे असते. असे पंख ल्यालेले मोजकेच असतात आणि त्यांनी त्यांच्या ईप्सिताला गवसणी घातली, असे ठामपणे ज्यांच्याविषयी सांगता येते अशी मंडळीही मोजकीच असतात. अशा मोजक्या यशस्वी मंडळींपैकी एक नाव आहे अनिलभाई पटेल.

अनिलभाई पटेल आफ्रिकेतील बोत्सवाना या देशात जातात. तेथे स्वत:चा उद्योगधंदा उभारतात. एक यशस्वी उद्योजक म्हणून स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करतात. वयाला लाजवेल अशा उत्साहाने, शिस्तीने हाती घेतलेल्या उपक्रमात स्वत:ला झोकून देतात. सततचा ध्यास आणि परिश्रम करण्याची धडाडी, यामुळे नुसत्या उद्योगजगतातच नव्हे तर सामाजिक जीवनातही एक नवा आदर्श निर्माण करतात. अशा एका यशस्वी व्यक्तिमत्त्वाच्या एक नवा आदर्श निर्माण करतात. अशा एका यशस्वी व्यक्तिमत्त्वाच्या जीवन प्रवासाचा आलेख चितारणारे पुस्तक म्हणजे 'पिठाई ते पिकवे.'

अनिलभाई गुजरातमधील पिठाई गावचे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, 'पूर्वज चौदाव्या शतकात खैबरघाटीतून, उत्तरेकडून आले, फक्त दोर आणि लोटा घेऊन. ते पिठाईला स्थिर झाले. जमिनी केलेल्या, शेतीवाडी, घरदार वसवले.'

अनिलभाईंचा सुरुवातीचा काळ याच गुजरातमधला. सिव्हिल इंजिनीयर म्हणून काही काळ वेगवेगळ्या क्षेत्रांत नोकरी केली. परंतु त्यापेक्षा काही वेगळे करायचे हा ध्यास. त्यासाठी नोकरी सोडून आफ्रिकेला प्रयाण केले. ही भरारी त्यांच्या यशस्वी जीवनाला कलाटणी देणारी ठरली. येथे त्यांचा प्रवास नोकरी, उद्योगात भागीदारी आणि पुढे स्वत:चा उद्योग, अशा चढत्या क्रमाने झाला. लायन्स क्लबचे गव्हर्नरपद चालून आले. त्यातून जागतिक शांततेचा संदेश देत अनेक उपक्रमांद्वारे समाजाभिमुख राहण्याची संधी त्यांना मिळाली.

अनिलभाईंचा हा जीवनप्रवास शुभांगी पाटील यांनी 'पिठाई ते पिकवे' या चरित्रग्रंथात शब्दबद्ध केलेला आहे. दुसऱ्याचे चरित्रलेखन करणे ही खरे तर तारेवरची कसरत असते. कुटुंब, संस्कार, संस्कृती, चालीरीती, वैयक्तिक स्वभाव, परस्परांशी असलेली नाती आणि त्यांच्याकडे भावबंध, अशा अनेक पातळ्यांवर व्यवधान ठेवून, कुठे तोल बिघडणार नाही याची काळजी घ्यावी लागते. त्याचबरोबर साहित्यमूल्यांचीही जपणूक करण्याचे भान राखावे लागते. सरळधोप अशी घटनांची मालिका जुळवून कर्तव्य पार पाडल्याचे समाधान मिळवणे सोपे असते. परंतु तसे करणे म्हणजे स्वत:चा प्राण हरवल्याचाच अनुभव पदरी येतो. हे सारे मात्र लेखिकेने कसोशीने समोर ठेवून लेखन केलेले आहे. त्यासाठी केलेल्या प्रयत्नांची आणि स्वीकारलेल्या लेखनतंत्राची खास नोंद घ्यायला हवी. 'फ्लॅशबॅक' या तंत्राचा उपयोग करून कथानकाला नेमकेपण तर मिळालेच परंतु त्याच्यासोबत सुंदर अशी गुंफण करण्याचा प्रयत्न दाद द्यावा इतका यशस्वी झाला आहे. अनिलभाई किडणी आजाराच्या उपचारासाठी दवाखान्यात आहेत हा केंद्रबिंदू. इथेच अनिलभाई आणखी एका लहान अनिलशी जोडले जातात, 'एक झाड आणि दोन पक्षी' याप्रमाणे. लहान अनिल ते दवाखान्यात असलेले यशस्वी अनिलभाई असा प्रवास व्हाया कुटुंबाचा इतिहास. त्यातल्या मोटाबा, दादा ते सर्व आप्त, त्यांची प्रत्येकाची वैशिष्ट्ये; इथे अतिशय कौशल्याने दाखवले आहे. लेखिकेचे हे कौशल्य केवळ तंत्रापुरते मर्यादित नाही, त्यांची साहित्यिक जाण आणि त्यांच्याकडे असलेली प्रतिमा, यांचाही सुंदर आविष्कार इथे अनुभवास येतो. त्यांची ओघवती आणि सहज लेखन तरलता सुखावून जाते. मनोविश्लेषण करताना काही ओळी त्या सहजपणे लिहून जातात, जिथे आपण हरखून जातो. 'स्त्रीचे पूर्ण आयुष्य सासरी गेले तरी माहेराची माया काही संपत नाही.' 'लग्न करून सासरी गेलेल्या मुली अंगणात चिवचिवाट करणाऱ्या चिमण्यासारख्या असतात. योग्य वेळासाठी येतात आणि भुर्रकन उडून जातात. पण त्या थोड्याशा वेळातपण आपल्या किलबिलाटाने आईवडिलांचे मन आनंदित करतात.'

सदरचे लेखन हा लेखिकेचा पहिलाच प्रयत्न असल्याचा त्या मनोगतात नमूद करतात. हा प्रयत्न यशस्वी व्यक्तिमत्त्वाइतकाच यशस्वी झाला आहे असे निश्चितपणे म्हणता येईल.

दिनेश पैठणकर यांनी अतिशय सुरेख अशी मुखपृष्ठाची रचना केली आहे.

**मूल्य ३०० रुपये   सवलतीत १८० रुपये**




# ग्रंथपान

**आत्मभान**
**गो.श्री. पंतबाळेकुंद्री**




**चाकोरीला विस्तारणारे प्रायोगिक स्वभान**

''शासकीय कामकाज कसे चालावे याबद्दल 'रूल्स ऑफ बिझनेस' नावाची पुस्तिका आहे. त्यात असा नियम आहे, की एखादा घेतलेला निर्णय नियमांनुसार योग्य नाही, असे एखाद्या खात्याला वाटत असेल तर मुख्य सचिवामार्फत ती फाईल राज्यपालांपर्यंत पाठवण्याचे अधिकार त्या खात्याच्या सचिवांना आहेत. कारण सरकारी अधिकारी हा प्रत्येक निर्णय 'राज्यपालांच्या वतीने आणि राज्यपालांकरिता' काढत असतो. त्यामुळे निर्णय घेणारी व्यक्ती निवडून आलेली असली तरी निर्णय मात्र शासनाचे असतात असे गृहीत धरले जाते.''

शासनाच्या सेवेत प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करत असताना अनेक प्रकारचे अनुभव वाट्याला येतात. काही क्रियाशील भरीव कार्य आपल्या हातून झाले याचा सुखद समाधानठेवा आयुष्यभर बाळगण्याचे भाग्य लाभते ते या सेवेतच. तसे गोडकटू अनुभवांचे संचितही टाळता येत नाही. याचे कारण या व्यवस्थापन प्रक्रियेत निर्णय घेणारा कुणी एक असला तरी त्यात अनेकांचा सहभाग असतो. अनेक म्हटले की व्यक्ती तितक्या प्रकृती ही उक्ती मान्य करावी लागते. तरी या शासकीय प्रक्रियेबद्दलचे कुतूहल टाळता येत नाही. केवळ निघालेला आदेश वा सुरू झालेला प्रकल्प एवढेच दृश्यस्वरूप सामान्याच्या नजरेसमोर येते, परंतु त्यामागे असलेली निर्णयप्रक्रिया कशी आणि किती वेळात पार पडते हे तसे केवळ कुतूहलाचे ठरते. असे कुतूहल काही प्रमाणात समाधान तेव्हाच पडेल जेव्हा संबंधित अधिकारी त्यांच्या अनुभवांचे संचित वाचकांसमोर उलगडून दाखवील. गो.श्री. पंतबाळेकुंद्री यांनी अशी अनुभवांची शिदोरी वाचकांच्या हाती दिली आहे. तिचे नाव आहे, 'आत्मभान.'

गो.श्री. पंतबाळेकुंद्री हे सिव्हिल इंजिनीयर असलेले अधिकारी. १९६२ साली शासकीय सेवेत दाखल झाले ते रचना साहाय्यक (प्लॅनिंग असिस्टंट' या पदावर कोल्हापूर येथील कार्यालयात. त्यानंतर ते 'नगर रचनाकार' म्हणून राजवटीत अधिकारी झाले. पुढे साहाय्यक संचालक, नगररचना, अपर सचिव, उपसचिव, उपसंचालक ही पदे त्यांनी भूषवली. त्यांच्या सेवेचा काळ २००९ पर्यंतचा. त्यानंतर नागरी वारसा जतन अर्बन हेरिटेज कॉन्झर्वेशन सोसायटी आणि पर्यावरण सुधारणा सोसायटी या दोन संस्थांचे सचिव म्हणून त्यांनी काम पाहिलेले आहे.

पंत हे स्वतंत्रवृत्तीचे आहेत. कल्पकता आणि ठाम निर्णय घेण्याची क्षमता ही त्यांची आयुधे आहेत. कायदा, नियम, आपल्या कामातील सर्व बारकावे यांचे चोख आणि अद्ययावत असे ज्ञान त्यांनी संपादन केले. तज्ज्ञ म्हणून ते ओळखले जातात. जे करेन ते नियम आणि कायद्याच्या चौकटीत राहूनच, हा कणखरपणा आणि त्यापासून तसूभरही मागे हटणार नाही हा ताठ बाणा त्यांची कवचकुंडले आहेत. अशा कणखर, ताठ, तज्ज्ञ माणसाच्या वाट्याला रोष नावाचे बाण नेहमीच झेलावे लागतात, पंतही त्याला अपवाद नाहीत.

राज्याच्या अनेक जिल्ह्यांत सेवा केल्यानंतर मंत्रालयात स्थिर झाले. मंत्रालयाविषयी त्यांनी संबंधित खात्याच्या मंत्र्यांना स्पष्टपणे बजावले, की 'मंत्रालयाचे काम कायदेकानूनुसार करायचे आहे. वैयक्तिक अडचणी सोडवण्यासाठी मंत्रालय नाही. त्यासाठी आपल्यावर दडपण आणावे, असे चालणार नाही.'

'नगररचना' या खात्याच्या अंतर्गत येणारी अनेक कामेही बाह्य विकास आखाडा, राखीव भूखंड, जमिनी या विषयांशी संबंधित असतात आणि याच कामांसाठी अनेकांचे हितसंबंध हस्तांदोलनातून जाणले जातात. परंतु पंतांनी स्वत:च्या विवेकापासून कधीही फारकत घेतलेली नाही. आमदार, मंत्री, मुख्यमंत्री आणि विकासक या सगळ्यांशी पंतांचा संबंध आला आणि प्रत्येकाने आपले हित कायदा गुंडाळून जपावे यासाठी पंतावर दडपण आणले, त्यासाठी अनेकदा खडाजंगी झाली. थेट गडचिरोलीच्या पलीकडे बदली करा, हा माणूस मंत्रालयात नको इतपर्यंत मजल गेली. परंतु द्वारकानाथ कपूर, जोसेफ यांसारखे कर्तव्यनिष्ठ अधिकारी नेहमीच त्यांच्या पाठीशी राहिले. याचे कारण कामावरील चोख निष्ठा आणि कुठलाही आरोपाचा शिंतोडा अंगावर नाही.

त्यांना बॅ. रामराव आदिक, रणजित देशमुख, पतंगराव कदम, अशोक चव्हाण, निलंगेकर–पाटील, शंकरराव चव्हाण, मनोहर जोशी अशा अनेक थोर राजकारणी, मंत्र्यासह, मुख्यमंत्र्यांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्या सगळ्यांचे अनुभव येथे संग्रहित केलेले आहेत. आपल्या कामावर निष्ठा कशी असावी, याचे सूत्र पंतांनी स्वत: निश्चित केले होते. त्याप्रमाणे त्यांनी सार्वजनिक हित, जुनी सुंदर शिल्पे भासावीत अशा इमारती, किल्ले यांचे जतन व संवर्धन कसे करता येईल, याच ध्यासाने आपले मूल्य जपले आहे. त्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत, त्याचा लेखाजोखा अतिशय रसाळ पद्धतीने मांडलेला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्याचे अनुभवदर्शन आणि राजकारणीमंडळी प्रशासनाकडे आमजनतेच्या दृष्टीने कशी पाहतात, त्याचे दर्शन यातून झालेले आहे.

सतीश भावसार यांनी मुखपृष्ठाची रचना सुंदर केली आहे.

**मूल्य २०० रुपये   सवलतीत १२० रुपये**